ख्यातनाम गायक, संगीतकार

मुंबई, २९ जुलै (प्रतिनिधी): सुगम संगीतावर आपली स्वरमुद्रा ठसवून ती विलक्षण लोकप्रिय करीत ६० वर्षांहून अधिक काळ मराठी रसिक मनांवर अधिराज्य गाजविणारे सुप्रसिद्ध गायक आणि संगीतकार सुधीर फडके तथा बाबूजी यांचे आज सकाळी साडेदहा वाजता येथे निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी ललिताबाई, पुत्र संगीतकार श्रीधर आणि सून व नातवंडे असा परिवार आहे. गेल्या २३ जुलै रोजी मेंदूतील रक्तस्रावामुळे त्यांना येथील हिंदुजा इस्पितळात दाखल करण्यात आले होते. बाबूजींच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या भावविश्वाला जबर धक्का बसला आहे.

- कलासक्त राष्ट्रभक्त (अग्रलेख पान ६ पाहा)

'वृत्तान्त' मध्ये...


- बाबूजींचे जीवनदर्शन,
- गाणी बाबूजींच्या गळ्यातली...
- 'आता मला खुशाल ने... मी तयार आहे..'
- खडतर पण संगीतमय जीवनपट.

उद्या, मंगळवारी सकाळी नऊ ते दुपारी चार वाजेपर्यंत त्यांचे पार्थिव शिवाजी पार्क येथील सावरकर स्मारकात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर अंत्ययात्रा निघेल आणि दादर स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.


कलानगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या कोल्हापूर येथे २५ जुलै १९१९ रोजी सुधीर फडके यांचा जन्म झाला. १९२९ मध्ये आईच्या निधनानंतर शिक्षण आणि संगीत शिक्षणासाठी ते मुंबईत आले. मुंबईत सरस्वती संगीत विद्यालयातर्फे दरवर्षी होणाऱ्या संगीत स्पर्धेत सुधीर फडके यांनी प्रथम क्रमांक पटकावला आणि त्यानंतर तब्बल साठ वर्षांहून अधिक काळ त्यांची गायनाची आणि संगीताची उपासना चालूच राहिली. या प्रदीर्घ संगीतमय कारकीर्दीत बाबूजींनी अक्षरश: शेकडो गाणी गायिली आणि असंख्य चित्रपटांना संगीतही दिले. पार्श्वगायक आणि संगीतकार या दोन्ही आघाड्यांवर अलौकिक कामगिरी करणाऱ्या बाबूजींचा वेळोवेळी शासनाकडून, विविध संस्थांकडून अनेक पुरस्कार देऊन गौरव झाला. पण या पुरस्कारांचा बडेजाव न मिरवता किंवा त्यातच रमून न जाता बाबूजींना आपलं संगीत

वेगळ्या पद्धतीची ध्वनिमुद्रिका काढणे राहूनच गेले! –लता मंगेशकर

पुणे, २९ जुलै (प्रतिनिधी) : बाबूजींसमवेत वेगळ्या पद्धतीची ध्वनिमुद्रिका काढण्याची माझी इच्छा होती, पण आता ती अपुरीच राहिली आहे, अशी खंत व्यक्त करून विख्यात गायिका लता मंगेशकर यांनी सुधीर फडके यांना श्रद्धांजली अर्पण केली. 'लाखाची गोष्ट'मधील 'त्या तिथे पलिकडे' हे सुधीर फडके यांचे गाजलेले गीत तसेच त्यातील भैरवीही खरे तर मी गाणार होते; त्याची तालीमही केली होती. पण प्रकृती बिघडल्याने गाऊ शकले नाही, 'लाखाची गोष्ट' आणि 'सुवासिनी'मधील गीते खूप आवडली होती. असेही लतादीदी म्हणाल्या. जी. एन. जोशी, गजानन वाटवे यांच्या भावगीतांच्या काळापेक्षा बाबूजींच्या संगीताचा बाज, रूप वेगळे होते. चित्रपटासाठी पान ५ पाहा ➤



सुधीर फडके यांचे निधन



साधना चालू ठेवलीच पण आपल्या मनात योजलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्पही तडीस नेले. प्रकृतीची फारशी साथ लाभत नसतानाही 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट पूर्ण करण्यासाठी सुधीर फडके यांनी प्रयत्नांची जी पराकाष्ठा केली त्याचे साऱ्या देशातून कौतुक झाले.

ग. दि. माडगूळकर आणि सुधीर फडके या गीतकार आणि गायक- संगीतकार जोडीने अक्षरशः असंख्य गीते मराठी माणसाच्या मनात रुजवली. या गीतगायनाचा कळसाध्याय 'गीतरामायणा'च्या रूपाने रसिकमनाने अनुभवला. शब्द आणि सूर यांचे अद्वैत म्हणजे काय याचा आदर्शच लोकांना गीतरामायणातून पाहायला मिळाला.

बाबूजींनी शब्द व स्पष्टोच्चारांची जाण दिली ! -आशा भोसले

मुंबई, २९ जुलै (प्रतिनिधी) : 'बाबूजी' ऊर्फ सुधीर फडके यांनी आपल्याला स्पष्ट उच्चार आणि शब्दांची जाण दिली, त्यांचे आणि माझे गुरु शिष्याचे नाते होते आणि तेच शेवटपर्यंत राहिले. मीही त्यांना तसाच ज्येष्ठत्वाचा मान दिला. या शब्दांत प्रख्यात गायिका आशा भोसले यांनी बाबूजींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. बाबूजी आणि माझी कारकीर्द जवळपास सारखीच सुरू झाली आणि पुढे सुमारे ५० ते ५२ वर्षे आम्ही एकत्र काम केले. 'पुढचं पाऊल' या चित्रपटापासून आमचा गायनप्रवास सुरू झाला आणि तो कायम टिकला. वसंत प्रभू, वसंत पवार, वसंत देसाई आदी संगीतकारांची जशी एक शैली होती, तशीच बाबूजींचीही विशिष्ट शैली **पान ७ पाहा ➤**

बालगंधर्व आणि हिराबाई बडोदेकर हे बाबूजींचे आदर्श होते. या दोन दिग्गजांच्या गायनातील कोमल स्पष्ट शब्दोच्चार आणि स्वरांमधील अभिजात लाघव ही शक्तिस्थाने बाबूजींनी आत्मसात केली. शब्द आणि सूर यांच्यावर बाबूजींनी कमावलेल्या हुकमतीमुळेच 'तिन्ही लोक आनंदाने', 'कधी बहर कधी शिशिर', 'अशी पाखरे येती', 'तोच चंद्रमा नभात', 'सखी मंद झाल्या तारका', 'समाधी साधन संजीवन नाम' ही बाबूजींनी गायलेली गाणी रसिकांसाठी मेजवानी ठरली.

स्पष्ट शब्दोच्चारांवर भर देणारा संगीतकार

गीतकाराच्या शब्दातील भावना अचूकपणे रसिकापर्यंत पोहोचविण्यासाठी गायकाकडून स्पष्ट शब्दोच्चारांवर भर देणारे संगीतकार म्हणून सुधीर फडके यांची ख्याती होती. मनाला योग्य वाटणारी चाल जोपर्यंत समाधान देत नाही, तोपर्यंत त्या चालीवर मेहनत घेऊन रसिकांना गीताचा आनंद देणारे 'बाबूजी' या नावाने परिचित असणाऱ्या सुधीरजींचे खरे नाव रामचंद्र विनायक फडके. कोल्हापुरात वामनराव पाध्ये यांच्यासारख्या गुरूंकडून वयाच्या सातव्या वर्षी संगीताची उपासना सुरू झाली.

१९३४ मध्ये ज्यांच्या आधाराने बाबूजींनी मुंबईत पाऊल टाकले त्या डॉ. भाजेकर यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांनी परत कोल्हापूर गाठले. तेथे श्रीकृष्ण हार्मोनियम क्लासच्या न. ना. देशपांडे यांच्या साथीने त्यांनी या क्लासमध्ये गाणे शिकवण्यास सुरुवात केली. या क्लासतर्फे 'श्रीकृष्ण मेळा' **पान ७ पाहा ➤**